मुख्य कार्यालय
विरार (प)
ता. वसई, जि. पालघर
पिन कोड - ४०१३०३

दुरध्वनी :०२५०-२५२५१०५/०६/२५२९८८८/२५२९८९०
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई- मेल :vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. :- व.वि.श.म./वृ.प्रा-उद्यान/७०९८/२५-२६
दिनांक :- २७/१०/२०२५

# स्वारस्य अभिरूची सुचना
## प्रथम मुदतवाढ

वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील खालील तक्त्यात नमूद **उद्यानांची देखभाल व सुशोभिकरण** Public Private Partnership तत्वावर देखभाल व संचालन करावयाचे आहे. तरी, शहरातील सर्व विकासक, सार्वजनिक संस्था, बँक इंडस्ट्रीयल असोसिएशन, अशासकीय संस्था यांना सुचित करण्यात येते की, आपण सदर उद्यानांच्या देखभालीचे व सुशोभिकरणाचे काम Public Private Partnership तत्वावर करणेस इच्छूक असल्यास वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागास लेखी अर्ज करावा.

- **कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे :-**

**१) महानगरपालिकेच्या मालकीच्या उद्यानांमध्ये असलेल्या फुले-फळ झाडांची निगा राखणे.**
**२) वेळोवेळी पाणी देणे.**
**३) फुलझाडांना औषध फवारणी करणे.**
**४) शेणखत घालणे.**
**५) जमिनीची मशागत करणे.**
**६) वेळोवेळी झाडांची योग्य पदधतीने छाटणी करणे.**
**७) उद्यानातील गवत कापणे व उद्यानातील शोभा वाढविण्याच्या दृष्टिने सुशोभिकरण करणे.**
**८) उद्यानांची राखण करणे, उद्याने वेळेवर उघडणे व बंद करणे.**
**९) उद्यानांतील दिवे वेळेवर चालू करणे व बंद करणे.**
**१०) तसेच वेळोवेळी महानगरपालिकेने दिलेल्या सूचनांनुसार उद्यानांची देखभाल करणे.**

याकरीता, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील नोंदणीकृत संस्थांनी तक्त्यात नमूद केलेल्या **उद्यानांची देखभाल व सुशोभिकरण** Public Private Partnership तत्वावर **३ वर्षाकरीता** देखभाल व संचालन विना मोबदला करावयाचे आहे. तरी, शहरातील सर्व विकासक, सार्वजनिक संस्था, बँक इंडस्ट्रीयल असोसिएशन, अशासकीय संस्थानी सहभाग नोंदवावे. तसेच अधिक माहितीसाठी वृक्षप्राधिकरण व उद्यान विभाग, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

(सही/-)
(स्वाती देशपांडे)
उप-आयुक्त तथा वृक्षअधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
वृक्षप्राधिकरण उद्यान विभाग